# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२०/M/०००८०५**

**अपिलार्थी श्री. राहूल राजबहादूर सिंग**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा (अभियंता विभाग)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.०९.२०२१**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १८.१०.२०१९ | - | २५.११.२०१९ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २९.०१.२०२० रोजीच्या अर्जान्वये खालील कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे:-

"Not satisfied with responses from the Public Information Officer and the First Appellate Authority the Second Appeal has been filed before the Commission.

The First Appellate Authority neither fixed any hearing, nor did passed any orders.

As per Section 19(6) of the RTI Act 2005, An Appeal under section 19(1) shall be disposed of within thirty days of the receipt of the appeal or within such extended period not exceeding a total of forty five days from the date of filing thereof, as the case may be, for reasons to be recorded in writing.

However if the First Appellate Authority does not pass any order within the Thirty days period it is a deemed Refusal".

२. अपिलार्थी यांनी दि. १८.१०.२०१९ च्या माहिती अर्जान्वये खालील माहिती विचारलेली आहे :-

"Kindly provide the details in form of documents, a stamped, signed and certified copies of LOI (LETTER OF INTENT) issued by SRA Authorities dated 09.11.2015 and dated 20.02.2016 to the below mentioned Slum Rehabilitation Scheme:

SRS Name- Shri Krishna Co. Op Hsg Soc. Ltd.

Address- CTS Survey No. 509 and 510 (pt), Subhash Nagar, Pokharan Road No. 2, TMC, Panchpakhadi, Thane (W), 400604."

..२/-

३. तथापि, वरील माहिती अर्जास अनुसरुन संबंधित जन माहिती अधिकारी, झो.पु.प्रा.मुंबई यांनी माहिती / उत्तर देण्याची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच, अपिलार्थींच्या दि. २५.११.२०१९ च्या प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी, झो.पु.प्रा.मुंबई यांनी देखिल सुनावणी किंवा आदेश देण्याची कार्यवाही केलेली नाही.

४. तसेच सदर द्वितीय अपील अर्ज ज्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या / जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या विरोधात सादर केला आहे व आयोगाच्या दि. ०१.०९.२०२१ च्या सुनावणी नोटीसीन्वये उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत त्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा (पूर्व) मुंबई या सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस कोणतीही पूर्व सूचना न देता अथवा कोणतेही लेखी म्हणणे सादर न करता अनुपस्थित राहिले आहेत त्यामुळे त्यांची बाजू समजून घेता आली नाही.

त्याऐवजी तत्कालीन व विद्यमान (दोन्ही) जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता, मुंबई महानगर प्रदेश झो.पु.प्रा., ठाणे (बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून) हे अपील सुनावणीस उपस्थित आहेत.

६. सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी, ठाणे कार्यालय यांनी दि. ०९.०९.२०२१ च्या पत्रान्वये असे निदर्शनास आणले की, याच समान विषयाबाबत अपिलार्थी यांनी दि. १८.१०.२०१९ च्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, झो.पु.प्रा., ठाणे (प) या कार्यालयाकडे माहितीची मागणी केली होती. त्यानुसार अपिलार्थी यांना दि.०५.११.२०१९ च्या पत्रान्वये Letter of intent च्या दि. ०९.११.२०१५ च्या ०६ प्रतीकरिता प्रती पृष्ठ २ प्रमाणे एकूण रु.१२/- व दि.२०.०२.२०१६ च्या प्रतीकरिता ६३ प्रतीकरिता प्रती पृष्ठ २ प्रमाणे रु.१२६/- इतके माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानंतर त्याच माहितीसाठी अपिलार्थींनी मुंबईच्या कार्यालयात माहितीचा अर्ज व प्रथम अपील सादर केले आहे.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये श्रीकृष्ण को.ऑप.हौ.सो., सर्व्हे नं.५०९-५१० सुभाषनगर, पाचपाखाडी, ठाणे (पश्चिम) या संस्थेच्या Letter of intent बाबतची माहिती मागितली असून सदर विषय / संबंधित सोसाटीचे कार्यक्षेत्र, एस.आर.ए., ठाणे कार्यालयाशी संबंधित असल्याने याबाबत त्या कार्यालयामार्फत त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जानुसार शुल्क भरण्याबाबत कळविण्याची कार्यवाही केली आहे.

तसेच, प्राप्त प्रथम अपीलाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (अभि.विभाग) झो.पु.प्रा., ठाणे यांनी दि.०३.१२.२०१९ च्या सुनावणी नोटीसीन्वये दि.१९.१२.२०१९ रोजी अपील सुनावणी आयोजित केली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित राहिल्याने सुनावणी पुन्हा दि.०२.०१.२०२० रोजी आयोजित करण्यात आली. परंतु, सदर सुनावणीस देखिल अर्जदार उपस्थित राहिले नाहीत. सदर दोन्ही वेळी आयोजित सुनावणीबाबत अपिलार्थी यांना स्पीड पोष्टाद्वारे व नोंदणीकृत पोष्टाने हजर राहण्याबाबत कळविले होते. या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांना दि.०४.०१.२०२० रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत :-

" अर्जदार यांच्या दि.१८.१०.२०१९ च्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकाऱ्यामार्फत विहित मुदतीत कार्यवाही झालेली असल्याने सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे."

७. तथापि, सदर द्वितीय अपील सुनावणीनंतर अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि.१६.०९.२०२१ च्या पत्रान्वये सादर केले आहे. त्यात त्यांनी अपील ज्यांच्या विरोधात आहे ते एस.आर.ए, बांद्रा येथील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या ऐवजी एस.आर.ए.ठाणे कार्यालयातील अधिकारी उपस्थित आहेत व सदर ठाणे कार्यालय बृहन्मुंबई खंडपीठाच्या कार्यक्षेत्रात येत नाही असे नमूद केले आहे.

८. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींनी दि. १८.१०.२०१९ च्या माहिती अर्जान्वये वरील परि क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे श्रीकृष्ण को.ऑप.हौ.सो.,सर्व्हे नं.५०९-५१० सुभाषनगर, पाचपाखाडी, ठाणे (पश्चिम) या संस्थेच्या संबंधित दि.०९.११.२०१५ व दि.२०.०२.२०१६ च्या Letter of intent बाबतची माहितीची मागणी केली होती. परंतु, उपलब्ध कागदपत्रानुसार संबंधित जन माहिती अधिकारी, झो.पु.प्रा.मुंबई व प्रथम अपिलीय अधिकारी, झो.पु.प्रा.मुंबई यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

तसेच, अपील सुनावणीच्या अनुषंगाने दि.०९.०९.२०२१ च्या सुनावणी नोटीसीद्वारे निर्देश देवून देखिल संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, झो.पु.प्रा. बांद्रा, मुंबई हे अनुपस्थित असून त्यांची ही कृती योग्य नाही. या प्रकरणात कोणतीही कार्यवाही केलेली नाही किंवा अपिलार्थींचा प्राप्त अर्ज झो.पु.प्रा. ठाणे कार्यालयाशी संबंधित असल्याने त्या कार्यालयास हस्तांतरीत केले होते किंवा कसे, याबाबत उपलब्ध कागदपत्रांवरुन काहीही स्पष्ट होत नाही.

तथापि, अपिलार्थींना ज्या गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भातील “Letter of intent” ची माहिती अपेक्षित आहे ती संस्था मुंबई ऐवजी ठाणे येथील कार्यक्षेत्रातील असून त्याप्रमाणे माहितीशी संबधित कार्यालय / सार्वजनिक प्राधिकरण हे ठाणे येथे कार्यरत आहे व अपिलार्थींनी या विषयावर त्या कार्यालयाकडे माहितीची मागणी केली होती व त्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी वरील परि क्र.६ प्रमाणे कार्यवाही देखिल केली आहे. असे असतांना व अपिलार्थींस याची संपूर्ण जाणीव असतांनाही त्यांनी पुन्हा त्याच विषयावरील माहितीसाठी मुंबई येथील कार्यालयांत देखिल माहिती अर्ज सादर करण्याची कृती अनाकलनीय आहे.

वास्तविकत: माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) (क) (ख) मधील तरतूदीनुसार अर्जदाराने माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील व संबंधित आहे त्या नेमक्या / अचूक प्राधिकरणाकडे माहिती अर्ज करणे अभिप्रेत आहे. मात्र, अपिलार्थीने तसे न करता एकाच माहितीसाठी दोन ठिकाणी अर्ज केले आहेत.

वरील बाबी लक्षात घेता, या प्रकरणी अपिलार्थींनी सादर केलेले प्रथम अपील प्रथम अपिलीय अधिकारी, झो.पु.प्रा.,बांद्रा, मुंबई यांचे कार्यालय यांच्याकडे विहित सुनावणी प्रक्रियेसाठी परत पाठविणे योग्य राहिल. त्यांनी याबाबत विहित कार्यपध्दतीने सुनावणी घेवून निर्णय जारी करण्याची कार्यवाही करावी.

तसेच, प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय मान्य नसल्यास अपिलार्थी यांना आयोगाकडे द्वितीय अपील सादर करण्याची मुभा राहिल. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी, झो.पु.प्रा., बांद्रा मुंबई यांनी सदर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्यात अपिलार्थींच्या प्रथम अपील अर्जावर विहित कार्यपध्यदतीने सुनावणी घेवून योग्य ते आदेश पारित करावेत.**

२. तसेच सदर प्रथम अपील सुनावणीचे दिवशी जन माहिती अधिकारी व आवश्यक असल्यास सहाय्यक जन माहिती अधिकारी यांना माहिती अर्जातील अपेक्षित अभिलेख घेऊन बोलवावे व शक्य तोवर सुनावणीचे वेळीच त्यांना अपेक्षित अभिलेखाची (फक्त दि.०९.११.२०१५ व दि.२०.०२.२०१६ च्या Letter of intent) प्रमाणित प्रत देण्याची अथवा, नसल्यास तसे स्पष्ट व विविक्षीत उत्तर देण्याची कार्यवाही करावी.

अपिलार्थीस देण्यात आलेल्या माहितीविषयी अपिलार्थींच्या पोच पावतीसह आयोगास आदेशाच्या प्रतीसह उलट टपाली अनुपालन अहवाल सादर करावा.

३. सदर आदेश प्राप्त झाल्यापासून प्रथम अपीलाची सुनावणी किंवा निर्णय न झाल्यास अथवा प्राप्त निर्णयानंतरही जर अपिलार्थींचे समाधान न झाल्यास प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर ९० दिवसांच्या आत योग्य ती कागदपत्रे जोडून प्रस्तुत द्वितीय अपीलाचा संदर्भ नमूद करुन त्यांना आयोगाकडे नव्याने द्वितीय अपील करण्याची मुभा राहील. सदरहू अपीलाची सुनावणी प्राथम्याने घेण्यात येईल.

४. यासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Greater Mumbai

सुनील पोरवाल
(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : १८.०२.२०२२